महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGSE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमवरुधा/स्वी.स/ 1610 /२०२५ दि.: 31/7/2025 /२०२५

## कार्यालयीन आदेश

विषय:-शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये औषधे व सर्जिकल साहित्याचे साठवणुकीसंदर्भात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांचे काटेकोर पालन करण्याबाबत समिती गठित करणेबाबत.

संदर्भ:- वै.शि.व औषधीद्रव्ये विभाग जा.क्र.लोलेस-०७२५/प्र.क्र.२८०/प्रशा-२, दि. २९.०७.२०२५

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये गुणवत्तापूर्ण औषधे व उपभोग्य वस्तु रुग्णांना योग्य रीतीने व सुरक्षितरित्या पुरवण्यासाठी त्यांच्या साठवणुकीची योग्य व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. औषधे उपभोग्य वस्तू अयोग्य पद्धतीने साठविल्यास त्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन रुग्णांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव मध्ये औषधे व सर्जिकल साहित्याचे साठवणुकीसंदर्भात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांचे काटेकोर पालन करण्याबाबत खालील समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| ०१ | डॉ. विशाल इंदुरकर, प्राध्यापक, त्वचारोगशास्त्र विभाग | अध्यक्ष |
| ०२ | डॉ. तानाजी लाकाळ, वैद्यकीय अधिक्षक तथा अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक, धाराशिव | सदस्य सचिव |
| ०३ | डॉ. संतोष गोडभरले, सहयोगी प्राध्यापक, औषधशास्त्र विभाग | सदस्य |
| ०४ | डॉ. रोहन खैराटकर, सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकित्साशास्त्र विभाग | सदस्य |
| ०५ | श्री. शिवदास भंडारे, वरिष्ठ सहाय्यक तथा कार्यालयीन अधिक्षक, (रुग्णालय विभाग) | सदस्य |
| ०६ | श्री. सुमेध कांबळे, औषधनिर्माता, (औषधभांडार) | सदस्य |
| ०७ | श्री. राहुल चौधरी, औषधनिर्माता, (सर्जिकल भांडार) | सदस्य |
| ०८ | श्री. पुरुषोत्तम दांगट, वरिष्ठ लिपीक, (सर्जिकल भांडार) | सदस्य |

**समितीचे कर्तव्य व जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील.**

१) औषधे व वस्तू योग्य तापमान, आर्द्रता व इतर आवश्यक अटींच्या अधीन ठेवण्यात येत आहेत का याची सदर समितीने नियमित पाहणी करावी.

२) अयोग्य साठवणुकीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचा-यांवर उत्तरदायित्व निश्चित करून त्यांच्यावर आवश्यक कार्यवाही करावी.

३) औषधी व सर्जिकल साहित्य, ऑक्सिजन, किट्स, केमिकल इतर तत्सम साहित्य (CCL Lab) जीवरसायनशास्त्र, शरिरविकृतीशास्त्र आणि सुक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या चाचणीकरिता लागणारे साहित्यांची साठवणूक व देखभाल Guidelines नुसार करण्यात यावे.

४) दर महिन्याला समिती सदस्यांची बैठक घेऊन अधिष्ठातांकडे अहवाल सादर करावा.

५) औषध साठवणुकीसाठी आवश्यक भौतिक व तांत्रिक सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाहीत, याची तातडीने समीक्षा करून आवश्यक सुधारणांची अंमलबजावणी करावी.

६) तपासणी अहवाल त्रैमासिक स्वरुपात मा. अधिष्ठाता यांच्यामार्फत मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडे सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र द. चौहान,)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
धाराशिव.

प्रति- वरील सर्व संबंधितांस

प्रत- मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.